# ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद गोंदिया

जिल्हा परिषद प्रशासकिय इमारत, पतंगा मैदान, आमगांव रोड, फुलचुर, गोंदिया
ई-मेल- eebngondia@rediffmail.com / eebngondia@gmail.com  दुरध्वनी क्र.- (07182)-235245/231554

ग्राम स्तरावील लाभार्थ्यांना आर्थिक दृष्टीने परवडणाऱ्या व देखभाल दुरुस्तीला सुलभ अशा योजनांची निर्मिती करुन शुध्द तसेच पुरेसा पाणी पुरवठा सातत्याने करणे हे ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे प्रमुख ध्येय आहे. यामध्ये सर्व अस्तितवातील साधने/संसाधने व उद्भव, नैसर्गीक आपत्तीमध्ये सुध्दा (जसे की, टंचाई, पुरपरिस्थिती इ.) सक्षम राहतील याची वेळीच दखल घेणेसुध्दा समाविष्ट आहे. जिल्हयामध्ये पाणी पुरवठा विषयक धोरेण राबवितांना आवश्यक असलेले तांत्रिक सहाय्य पुरविण्या समवेतच ग्रामस्थ/लाभार्थ्यांना पाणी पुरवठा योजनेच्या विविध उपांगांच्या देखभाल दुरुस्ती करीता सक्षम करणे व योजनेच्या मालकी हक्काबाबतची जाणीव निर्माण करणे तसेच पाणी पट्टी आकारणीची रक्कम न चुकता भरण्याकरीता सक्षमीकरण करण्याचे सुध्दा नियाजित आहे.

| अ.क्र. | ठळक माहिती | |
|---|---|---|
| 1 | एकुण हातपंप | :- 9675 |
| 2 | एकुण विजपंप | :- 151 |
| 3 | एकुण सोलर पंप | :- 483 |
| 4 | एकुण साध्या विहीरी | :- 4486 |
| 5 | स्वतंत्र नळ योजना गावे/वाड्या | :- 383 योजना (418 गावे/वाड्या) |
| 6 | प्रादेशिक नळ योजना | :- 15 (जि.प.- 4, मजांप्रा- 5 व मंडळ-6) |

ग्रामीण पाणी पुरवठा विभागाअंतर्गत 3 ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग (गोंदिया, देवरी व नवेगावबांध) व 1 यांत्रिकी उपविभाग कार्यरत आहेत. सदर तीनही उपविभागांतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेची कामे करण्यात येत असुन यांत्रिकी उपविभागामार्फत विंधण विहीर/हातपंप, सौर उर्जेवर आधारीत दुहेरी पंप या कार्यक्रमांची अमलबजावणी करण्यात येते.

ग्रामीण पाणी पुरवठा विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची उद्दिष्टये खालीलप्रमाणे आहेत.

1. जिल्हीयात नळ पाणी पुरवठा योजना, विंधन विहीरी, हातपंप इ. योजनांद्वारे प्रत्येक गावाला 55 ली. प्रती माणसी/प्रती/दिवस शुध्द व मुबलक पाणी उपलब्ध करुन देणे.
2. पाणी पुरवठ्याकरीता निर्माण केलेल्या साधनाद्वारे सातत्याने पाणी पुरवठा होणे करीता सदर साधनांचे पंचासत समिती स्तारावरुन होत असलेल्या देखभाल दुरुस्तीचे संनियंत्रण व व्यवस्थापन करणे.
3. वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांच्या समन्वयाने उद्भव बळकटीकरण करणे तसेच प्रत्येक वर्षी पाणी टंचाई भासणाऱ्या संभाव्य गावे/वाड्यात उपाययोजनांची आखणी व अमलबजावणी करणे.
4. निर्मिती प्रक्रियेत असलेली संसाधने, गुणवत्ता पुर्ण व विहीत कालावधीत पुर्ण करुन त्याद्वारे पाणी पुरवठा सुरु करणे याकरीता देखील हा विभाग कटिबध्द आहे.

उपरोक्त उद्दिष्ट्ये पुर्ण करण्याकरीता ग्रामीण पाणी पुरवठा विभागा अंतर्गत खालील योजना राबविण्यात येतात.

Scanned with CamScanner

**अ) जल जीवन मिशन :-**

**1) स्वरुप :-** सन 2009-10 पासुन केंद्र सासन पुरस्कृत सुरु असलेला राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम जल जीवन मिशनमध्ये समाविष्ट करुन, पुनर्रचना करण्याचे केंद्र शासनानले ठरविले आहे. यानुसार ग्रामीण भागातील सर्व कुटुंबांना सन 2024 पर्यंत "हर घर नल से जल" (FHTC-functional Houschold Tap Connection) प्रमाणे पाणी पुरवठा करण्यास शासन कटिबध्द आहे. सन 2024 पर्यंत राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई किमान 55 लिटर प्रती दिन, गुणवत्तापूर्ण पाणी पुरवठा करणे हे जल जीवन मिशनचे प्रमुख् उद्दिष्ट आहे.

या अंतर्गत प्रत्येक ग्रामीण व्यक्तीस, स्वयंपाकासाठी आणि घरगुती वापरासाठी शुध्द व पुरेसा आणि शास्वत पाणी पुरवठा सर्वकाळ आणि सर्व परिस्थितीत सोयीच्या ठिकाणी उपलब्ध करुन देणे हे उद्दिष्ट आहे. यात फक्त योजना पुर्ण करणे एवढाच उद्देश नसुन कार्यक्षम पाणी पुरवठ्याची एक शास्वत सेवा उपलब्ध करणे हा त्यामधील प्रमुख गाभा आहे. केंद्र शासनाच्या कार्यरत मार्गदर्शक सुनांनुसार जल जीवन मिशनची राज्यात अंमलवजावणी करणे आणि मिशन अधिकाधिक परिणामकारक होण्याकरीता सध्या अस्तित्वातील अंमलवजावणीसाठीच्या प्रचलित कार्य पध्दती व निकषांमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

राज्य मंत्रीमंडळाच्या दि. 08.07.2020 रोजी झालेल्या बैठकीत राज्यात केंद्र शासन प्रणित जल जीवन मिशन राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. यानुसार राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला सन 2024 पर्यंत, वैयक्ति नळ जोडणीद्वारे दरडोई किमान 55 लिटर प्रती दिन, गुणवत्तापूर्ण पाणी पुरवठा करण्याचे लक्ष्य आहे. सदर जल जीवन मिशन 50:50 टक्के केंद्र व राज्य हिश्याने राबविण्यात येईल.

**2) उद्दिष्ट :-**

जल जीवन मिशनअंतर्गत, सन 2024 पर्यंत राज्याच्या ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबास घरगुती कार्यात्मक नळ जोडणीद्वारे विहित गुणवत्तेचे पाणी प्रती माणसी प्रती दिन किमान 55 लिटर या प्रमाणात उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे.

**3) कृती आराखडा :-**

1) जल जीवन मिशन अंतर्गत राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला पिण्याच्या पाण्याची सुरक्षा (Drinking water security) देण्यासाठी प्रत्येक घरात कार्यातमक नळ जोडणीद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येणार आहे. पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता ही किमान भारतीय दर्जा - BIS : 10500 अशी असावी असे अपेक्षित केले आहे.

2) राज्यातील प्रत्येक घराला कार्यात्मक घरगुती नळ जोडणीद्वारे (Functional Household Tap Connection) पाणी पुरवठा करण्यासाठी बेस लाईन सर्वेक्षण करुन पुढील 4 वर्षाचे नियोजन करण्यात यावे.

3) जल जीवन मिशन अंतर्गत प्रत्येक कुटुंबास सन 2024 पर्यंत घरगुती नळ जोडणीद्वारे पाणी पुरवठा सुविधा उपलब्ध करुन द्यावयाची आहे. यानुसार गाव कृती आराखडा (VAP), जिल्हा कृती आराखडा (DAP) व राज्य कृती आराखडा (SAP) तयार करावा. सदर कृती आराखड्यामध्ये द्यावयाच्या नियोजित घरगुती नळ जोडण्याचे व त्याकरीता आवश्यक असणाऱ्या निधीचे त्रैमासिक व वार्षिक नियोजन यांचा समावेश असावा. गाव कृती आराखडा तयार करण्यासाठी अंमलबजावणी सहाय्य संस्था (ISA), ग्रामीण पाणी पुरवठा विभाग/उपविभाग किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची मदत घेण्यात यावी.

**4) जल जीवन मिशन अंतर्गत योजनांची अंमलबजावणी :-**

जल जीवन मिशनमध्ये पुढील प्रकारच्या योजनांचा समावेश करावा.

Scanned with CamScanner

1) ज्या योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (NRDWP) अंतर्गत सुरु आहेत, अशा योजनांची सुधारणात्मक पुनर्जोडणी (Retrofitting) किमान 55 LPCD प्रमाणे करुन कार्यात्मक घरगुती नळ जोडणी करणे. तसेच ज्या गावांमध्ये स्टँड पोस्ट नळ पाणी पुरवठा योजना आहेत, अशा गावांमध्ये स्टँड पोस्टपासुन प्रत्येक कुटुंबापर्यंत/घरापर्यंत घरगुती कार्यात्मक घरगुती नळ जोडणी देण्यासाठी पूर्वीच्या योजनांची सुधारात्मक पुनर्जोडणी (Retrofitting) करणे.

2) पूर्ण झालेल्या योजनांच्या बाबतीत 40LPCD ऐवजी किमान 55 LPCD पाणी पुरवठा करण्याच्या अनुषंगाने अशा योजनांची सुधारणात्मक पुनर्जोडणी (Retrofitting) करणे.

3) ज्या गावांमध्ये पिण्यायोग्य मुबलक भूजल (किंवा अन्य पर्यायाद्वारे) उपलब्ध आहे, अशा गावांमध्ये स्वतंत्र योजना घेणे.

4) ज्या गावांमध्ये मुबलक भूजल (किंवा अन्य पर्यायाद्वारे) पाणीसाठा उपलब्ध आहे, मात्र पाण्याची गुणवत्ता योग्य नाही, अशा गावांमध्ये जल शुध्दीकरणाच्या प्रकल्पासह स्वतंत्र योजना घेणे.

5) ज्या गावांमध्ये पाण्याचे प्रमाण कमी आहे, अशा गावांसाठी प्रादेशिक/अनेक गाव योजना (Water Grid) घेणे.

6) आदिवासी भागात नळ पाणी पुरवठा सोय नसलेल्या आदिवासी गावे/वाड्या/पाडे यांना कायमस्वरुपी पाणी पुरवठा करुन प्रत्येक घरात कार्यात्मक नळ जोडणीद्वारे पाणी पुरवठा करणे, जल जीवन मिशनच्या मार्गदशक सुचनांनुसार शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, शासकीय वस्तीगृहे, अंगणवाडी इत्यादी करीता सदर योजनेतून नळ जोडणी देणे. तसेच एकाकी/आदिवासी वाडी/पाड्यांकरीता सौर ऊर्जा आधारीत नळ पाणी पुरवठा योजना राबविणे.

7) दलित वस्तीमधील सर्व घरांना कार्यात्मक नळ जोडणीद्वारे पाणी पुरवठा देणे व योजनेच्या लाभार्थ्यांची स्वतंत्र माहिती ठेवणे.

**5) जल जीवन मिशनची नवीन अंमलबजावणी कार्यपध्दती :-**

1) पाणी पुरवठा योजनांच्या विशिष्ट उपांगाचे (पाण्याची टाकी, पंप हाऊस ईत्यादी) संभाव्य संकल्पन चित्र आराखडे व त्यांची अंदाजपत्रके (भौगोलिक क्षेत्र आणि तेथील भौगोलिक परिस्थितीनुसार) राज्य पाणी व स्वच्छता मिशनकडून तयार करुन उपलब्ध करुन देण्यात येतील. त्याप्रमाणे सर्व यंत्रणांनी या आराखड्यानुसार पुढीलक कार्यवाही करावी.

2) पाणी पुरवठा योजनेसाठी लागणाऱ्या दर्जेदार (भारतीय मानांकनाप्रमाणे) बांधकाम व अभियंत्रिकी साहित्य/यंत्रसामुग्रीचा (पाई,विद्युत पंप, वॉल्व्हस, सिमेंट, स्टील वगैरे) आवश्यकतेप्रमाणे दरकरार करणे/ एजन्सी नेमणे ई. कार्यवाही राज्य पाणी व स्वच्छता मिशनद्वारे करण्यात येईल. या दरपत्रकावर आधारीत अंदाजपत्रके व आराखडे सर्व यंत्रणांनी करावेत.

3) राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या कार्यकारी समितीमार्फत पाणी पुरवठ्श योजनांच्या जलद अंमलबजावणीसाठी मध्यवर्ती निविदा प्रक्रियेद्वारे नामांकिकत बांधकाम संस्था व पुरवठादार यांचे जिल्ह्यासाठी पॅनेल तयार करण्यात येईल. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन या पॅनेलमधून पाणी पुरवठ्ज्ञ योजना करण्यासाठी एका योजनेकरीता एका संस्थेची निवड करेल. मात्र ग्राम पातळीवरील योजनांसाठी अशी निवड करताना जिल्हा समिी, ग्राम पाणी समितीला विश्वासात घेऊन/विचारविनिमय करुन अंमलबजावणी संस्थेची निवड करेल.

4) जिल्हयातील पाणी पुरवठा योजनांसाठी प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात राज्य पाणी व स्वच्छता मिशनकडून जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनला वित्तीय मर्यादेचे अधिकार प्रदान केले जातील.

5) पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणी दरम्यान आणि अंतिम देयक अदायगी करण्यापूर्वी जल जीवन मिशनच्यामार्गदर्शक सुचनांप्रमाणे त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करण्यात येईल. राज्य पाणी व स्वच्छता

Scanned with CamScanner

मिशनच्या कार्यकारी समितीमार्फत नेमलेल्या त्रयस्थ तपासणी संस्थांचे पॅनल मधील संस्थांमार्फत जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनकडून या गावांच्या योजनांची त्रयस्थ तपासणी करण्यात येईल.

6) स्वतंत्र योजनेसाठी जास्तीत जास्त 18 महिन्यांचा व अनेक गाव योजनांसाठी 36 महिन्यांचा कालावधी अनुज्ञेय राहिल. या योजना पूर्ण करण्यास 3 वर्षाचा कालावधी लागणार आहे, अशा योजनांचे कार्यादेश/कार्यारंभ आदेश/करार (Contract) अंमलबजावणी करीता मार्च 2021 पूर्वी देण्यात यावेत. ज्या योजना पूर्ण करण्यास 2 वर्षाचा कालावधी लागणार आहे, अशा योजनांचे कार्यादेश/कार्यारंभ आदेश/करार (Contract) अंमलबजावणीकरीता मार्च 2022 पूर्वी देण्यात यावेत, यानुसार गाव कृती आराखडा (VAP) व जिल्हा कृती आराखडा (DAP) तयार करण्यात यावा.

**6) जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन (DWSM)**

जिल्हयातील जल जीवन मिशनच्या संपूर्ण अंमलबजावणीसाठी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन जबाबदार असेल. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, 1961 च्या कलम 79 (अ) नुसार प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये स्थापन केलेल्या जिल्हा जल व्यवस्थापन व स्वच्छता समितीला जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन म्हणून कार्य करण्यास या विभागाच्या दिनांक 07.09.2011 च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तथापी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना विचारात घेता जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनची नव्याने खालीलप्रमाणे पुनर्रचना करण्यात येत आहे.

1) जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे जिल्हाधिकारी हे अध्यक्ष असतील व संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे सह अध्यक्ष असतील.

तसेच आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, प्रकल्प संचालक, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जलसंपदा विभाग, जलसंधारण विभाग, कृषी विभाग, वन विभाग, तसेच माहिती व जनसंपर्क या विभागाचे त्या जिल्ह्याचे प्रमुख अधिकारी या मिशनचे सदस्य असतील. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचे जिल्ह्यातील प्रमुख अधिकारी हे या मिशनचे सदस्य असतील. पाणी व्यवस्थापन, समाजविकास, सामाजिक आरोग्य या क्षेत्रातील नामांकित व्यक्ती तसेच स्थानिक खासदार, आमदार यांना या मिशनवर मानद सदस्य म्हणून घेता येईल. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा हे या मिशनचे सदस्य सचिव असतील.

2) जल जीवन मिशन चे जिल्हास्तरीय आराखडे, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनच्या मान्यतेनंतर, त्या जिल्हयाचे मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीसमोर सादर करण्यात येतील. या समितीमध्ये त्या जिल्हयांमधील सर्व मंत्री, तसेच मा. पालकमंत्री यांनी नेमलेले 3 आमदार हे सदस्य असतील. या समितीच्या सहमती नंतर सदर आराखडे हे राज्य स्तारावरील समिती पुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येतील. राज्यपातळीवर मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता), मा. राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता), अप्पर मुख्य सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता) व मिशन संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांची समिती (राज्यस्तरीय योजना मंजुरी समितीच्या मान्यतेनंतर) आराखड्यांना अंतिम मान्यता देईल.

**7) ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती (VWSC)**

ग्रामपंचायत अधिनियम, 1959 अंतर्गत स्थापित ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे पदसिध्द अध्यक्ष सरपंच असुन ग्रामसेवक पदसिध्द सदस्य सचिव आहेत. ही समिती जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे कार्यान्वित नळजोडणीद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी योजनांचे नियोजन, अंमलबजावणी आणि देखभाल दुरुस्ती करेल. गाम पाणी पुरवठा व्यवस्थापनासाठी ग्रामपंचायत स्तरावर जल जीवन मिशन आधि सार्वजनिक वित्तिय व्यवस्थापन प्रणाली (PFMS) च्या मार्गदर्शक सुचनांनुसार बँक खाते असेल आणि जल जीवन मिशन आणि सार्वजनिक वित्तिय व्यवस्थापन प्रणाली (PFMS) च्या मार्गदर्शक सुचना आणि ग्रामपंचायत

Scanned with CamScanner

लेखा संहितेनुसार त्यांचे आर्थिक व्यवहार करण्यात येतील. ही समिती जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे काम करेल.

**8) ग्राम पाणी पुरवठा समितीची कर्तव्ये व जबाबदाऱ्या ठळक बाबी पुढीलप्रमाणे आहेत :-**

1) गावातील सर्व कुटुंबांना घरगुती नळ जोडणी देण्याची संपूर्ण जबाबदारी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची असेल.

2) गाव कृती आराखडा तयार करणे, गावातील गाव अंतर्गत (In village) पाणी पुरवठा योजनांचे नियोजन, रचना, अंमलबजावणी, देखभाल-दुरुस्ती इ. ची जबाबदारी ही ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची असेल.

3) राज्य पाणी व स्वच्छता मिशनकडून मध्यवर्ती निविदा प्रक्रियेनुसार निवडण्यात आलेल्या संस्थांकडून/पुरवठादारांकडून बांधकाम सेवा/वस्तु/साहित्य प्राप्त करुन घेणे व त्या संस्थेकडून योजना राबवून घेणे.

4) त्रयस्थ संस्थेकडून होणाऱ्या योजनेच्या तपासणी व कार्यक्षमता मुल्यांकनाची व्यवस्था करणे.

5) योजनांचे सामाजिक लेखापरिक्षण हाती घेणे.

6) गावातील पाणी पुरवठा योजनेच्या पायाभुत सुविधाच्या भांडवली किमतीच्या 5% किंवा 10% लोकवर्गणी (आर्थिक/श्रमदान स्वरुपात) देण्याबाबत गावकऱ्यांना प्रोत्साहीत करणे. पाणीपट्टी आकरणे व वसुली करणे.

वरील ठळक बाबींसह केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती इतरही कामे करेल.

**9) ग्रामपंचायतींचे 10% सामुदायिक योगदान :-**

जल जीवन मिशन अंतर्गत गावामध्ये नव्याने पाणी पुरवठा योजना सुरु करण्यासाठी किमान 80 टक्के कुटुंबाकडून गावातील पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या एकूण भांडवली खर्चापैकी 10% (डोंगराळ/वन भागामध्ये किमान 5% व अनुसूचित जाती/जमाती लोकसंख्या असलेल्या क्षेत्रासाठी किमान 5%) लोकवर्गणी गोळा होणे अनिवार्य आहे. ही वर्गणी जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक तत्वानूसार रोख रकमेमध्ये किंवा श्रमदानाद्वारे अदा करता येईल. योजना पूर्ण झाल्यानंतर योजना यशस्वीरित्या चालविणे आणि पाणीपट्टी वसुल करुन या योजनेची देखभाल दुरुस्ती योग्य रितीने करणाऱ्या ग्रामपंचायतीस पुढील 5 वर्षाच्या काळात टप्याटप्याने, जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक तत्वानूसार, गावांतर्गत पाणी पुरवठा योजनेच्या पायाभूत प्रकल्पाच्या भांडवली खर्चाच्या 10% रक्कम प्रोत्साहनपर मिळेल.

**10) आर्थिक नियोजन व निधी व्यवस्थापन :-**

1) गावांतर्गत पाणी पुरवठा योजनेच्या कामांसाठी घेण्यात येणारी लोकवर्गणी रोख रक्कम किंवा वस्तु किंवा श्रमदान या स्वरुपात घ्यावयाची आहे. यासाठी ग्रामपंचायत/ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष व सचिव यांचे संयुक्तिकरित्या स्वतंत्र बँक खाते उघडण्यात यावे.

2) तसेच योजनेसाठी प्राप्त लोकवर्गणी व देखभाल दुरुस्तीसाठी केलेली पाणी पट्टी वसुली याबावत स्वतंत्रपणे नोंदवही (Ladgers) ठेवण्यात यावी.

**11) योजनांचे हस्तांतरण :-**

पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्यानंतर व परिक्षण पूर्ण झाल्यावर खर्चाचे वित्तीय लेखापरिक्षण, करुन योजना ग्रामपंचायतीस हस्तांतरण करण्यात यावी.

**12) जल जीवन मिशन शासन निर्णय :-**

1) शासन निर्णय क्रमांक: जजमि 2019/प्र.क्र.138/पापु-10(07), दिनांक 04 सप्टेंबर 2020

2) शासन निर्णय क्रमांक: जजीमि/0620/प्र.क्र.20/पापु-07, दिनांक 30 जुन 2020

3) शासन परिपत्रक क्रमांक: जजीमि/06020/प्र.क्र.20/पापु-07, दिनांक 03 ऑगस्ट 2020

Scanned with CamScanner

**ब) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम :-**

राज्यातील ग्रामीण व निमशहरी भागातील दिर्घकालीन गरजांचा व आरोग्याचा विचार करुन ग्रामीण जनतेस पुरेसे व शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने राज्याचा स्वत:चा सर्वसमावेशक असा, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या धर्तीवरच मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राज्यभरात सन 2016-17 ते 2019-20 या चार वर्षासाठी राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमासाठी 100% निधी राज्य शासनाकडून प्राप्त सदर योजनेअंतर्गत अर्धवट कामे मार्च 2022 पर्यंत पूर्ण करण्याची मुदतवाढ शासनाने दिली आहे.

राज्यातील ग्रामीण जनतेस व शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणे तसेच राज्यातील ग्रामीण व निमशहरी भागात पाणी पुरवठा योजना राबविणे हे या कार्यक्रमाचे मुख्य उद्देश आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना सक्षम प्राधिकाऱ्यांकडून तांत्रिक मान्यता व त्यानंतर प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येते.

**1) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम शासन निर्णय :-**

1) शासन निर्णय क्रमांक: ग्रापाधो-1115/प्र.क्र.92/पापु-07, दिनांक 07 मे 2016
2) शासन निर्णय क्रमांक: मुपेया-2017/प्र.क्र.14/पापु-19(शिकाना), दिनांक 11 जानेवारी 2018

**क) पाणी टंचाई कार्यक्रम:-**

**1) स्वरुप :-** जिल्हयातील पाणी टंचाई निवारणार्थ प्रत्येक वर्षी पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत, पाणी टंचाई आराखडा तयार करुन ज्या गावांना ऑक्टोबर ते जुन या कालावधीमध्ये पाणी टंचाई भासते अशा गावांचा पाणी टंचाई आराखड्यामध्ये समावेश केला जातो व आवश्यकतेनुसार उपाययोजना करण्यात येतात.

पाणी टंचाई आराखडा सर्व पंचायत समिती स्तरावर गटविकास अधिकारी व तहसिलदार यांचे संयुक्त स्वाक्षरीने कार्यकारी अभियंता यांचेकडे सादर करण्यात येतो. त्यानंतर आराखड्यातील गावांची तपासणी करुन आवश्यकतेनुसार खालील प्रकारच्या उपाययोजना प्रस्तावित करण्यात येतात व कामे पुर्ण करण्यात येतात. खालील सर्व उपाययोजनांपैकी कमी खर्चाची योजना सर्वेक्षण करुन आवश्यकतेनुसार गावांसाठी राबविण्यात येते व गावांची पाणी टंचाई समस्या सोडविण्यात येते.

**पाणी टंचाई अंतर्गत घेण्यात येणारी कामे**

1. विंधण विहीर/कुपनलिका घेणे.
2. नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे.
3. विंधण विहीरींची विशेष दुरुस्ती करणे.
4. तात्पुरती पुरक नळ योजना घेणे.
5. खाजगी विहीर अधिग्रहण करणे.
6. विहीर खोल करणे/गाळ काढणे.
7. बुडक्या घेणे.
8. टँकरने/बैलगाडीने पाणी पुरवठा करणे.

Scanned with CamScanner

**2) लाभार्थ्यांची पात्रता :-** पाणी टंचाई कार्यक्रम हा ज्या गावांना उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये 20 ली/माणसी पेक्षा कमी पाणी उपलब्ध होते अशा गावांचाच पाणी टंचाई आराखड्यात समावेश करण्यात येतो. त्याकरीता संदर्भ क्रमांक 2 अन्वये ग्रामसभेच्या ठरावाची नमुना प्रत गटविकास अधिकारी यांचेकडे सादर करण्यात येते. सदर माहीतीच्या आधारे गटविकास अधिकारी यांचे कडून सदर गावांची माहीती प्रपत्र अ मध्ये भरुन कार्यकारी अभियंता कायाृलयास सादर करण्यात येते. त्यानुसार गावांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करुन उपाययोजना प्रस्तावित करुन गावाचा पिण्याचे पाण्याचा प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न करण्यात येतो.

**3) अर्जाचा नमुना :-** सरपंच व ग्रामसेवक यांचे संयुक्त स्वाक्षरीने पिण्याचे टंचाई घोषीत करण्याबाबतचा ठरावाचा नमुना.

**4) सोबत जोडावयाची कागदपत्रे :-** पिण्याचे पाण्याची टंचाई घोषीत करण्याबाबतचा ग्रामसभेच्या ठरावाचा नमुना.

**5) अर्ज कोणाकडे सादर करावे :-** गटविकास अधिकारी, पंचायत समिती.

**6) पाणी टंचाई कार्यक्रम शासन निर्णय :-**

1)शासन निर्णय क्रमांक टंचाई - 1019/प्र.क्र.12/पापु-14, दिनांक 3 फेब्रुवारी 1999

2) शासन परिपत्रक क्र. टंचाई 1008/प्र.क्र.168/पापु-14, दिनांक 24.10.2008

3) शासन निर्णय क्र. टंचाई 1007/प्र.क्र.197/पापु-14, दिनांक 27.02.2008

4) शासन परिपत्रक क्रमांक- टंचाई 2020/प्र.क्र.116/पापु-14, दिनांक 22.09.2020

**क) आमदार/खासदार निधी कार्यक्रम :-**

**1) स्वरुप :-** ग्रामीण पाणी पुरवठा विभागांतर्गत मा. आमदार/खासदार यांच्याद्वारे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सुचविण्यात आलेल्या बोरवेल कामांचे सर्वेक्षण करुन कामांचे अंदाजपत्रक जिल्हा नियोजन कार्यालय गोंदिया यांचेकडे सादर केली जातात. त्यावर मा. जिल्हाधिकारी गोंदिया यांचे कडून प्रशासकीय मान्यता प्रदान झाल्यानंतर कामे पुर्ण केली जातात.

**2) लाभार्थ्यांची पात्रता :-** मा. आमदार/खासदार यांनी सुचविलेले ठिकाण.

**3) अर्जाचा नमुना :-** मा. आमदपार/खासदार यांनी दिलेली लेखी सुचना.

**ड) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण, अनुसुचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना) :-**

जिल्हा वार्षिक योजना सन 2019-20 अंतर्गत बिगर आदिवासी उपयोजना (DPC General), विशेष घटक योजना (SCP), जनजाती क्षेत्र उपयोजना (TSP) व जनजाती क्षेत्राबाहेरील उपयोजना (OTSP) या अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजना, विंधन विहीर, विजपंप दुरुस्ती, आश्रम शाळांना पाणी पुरवठा करणे इ. कामे प्रस्तावित आहेत. सन 2019-20 करीता प्रस्तावित तरतुद रु. 290.00 लक्ष निधी होती त्यापैकी मंजुर नियतव्यय रु. 40.00 लक्ष निधी आहे. मजुर नियतव्ययापैकी प्राप्त निरंक आहे.

सन 2019-20 मधिल शिल्लक रु. 817.83 लक्ष निधी, सन 2020-21 मध्ये प्राप्त रु. निरंक असे एकूण रु. 817.83 लक्ष निधी पैकी माहे सप्टेंबर 2020 अखेर रु. 215.10 लक्ष निधी खर्च करण्यात आलेला आहे.

Scanned with CamScanner

(रु. लाखात)

| अ.क्र. | योजनेचे नाव | सन 2019-20 | | सन 2020-21 | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त | खर्च | प्राप्त | खर्च |
| 1 | राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम | 1277.56 | 420.29 | 0 | 598.49 |
| 2 | मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम | 714.75 | 603.54 | 290.00 | 112.22 |
| 3 | पाणी टंचाई कार्यक्रम | 182.65 | 180.06 | 0 | 0 |
| 4 | आमदार/खासदार कार्यक्रम | 102.88 | 102.88 | 8.79 | 8.12 |
| | एकूण | 2277.84 | 1306.77 | 11.69 | 718.83 |

**ड) तक्रार निवारण कार्यालय :-**

| अ.क्र. | नोडल अधिकारी | कायालयाचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| 1 | श्री. दिलीप बागुल, उपकार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद गोंदिया | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद गोंदिया, फुलचुर पतंगा मैदान गोंदिया, दुरध्वनी क्रमांक 07182-231554 |

**माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये जिल्हा स्तरावरील शासकीय माहिती अधिकारी, सहाय्यक माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव,पत्ता व दुरध्वनी क्रमांक | माहिती अधिकाऱ्याचे नांव, पदनाम, पत्ता व दुरध्वनी क्रमांक | सहाय्यक माहिती अधिकाऱ्याचे नांव, पदनाम, पत्ता व दुरध्वनी क्रमांक | प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचे नांव,पदनाम, पत्ता व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1 | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद गोंदिया, फुलचुर पतंगा मैदान गोंदिया, दुरध्वनी क्रमांक : 07182-231554 | श्री. मुकेश वासनिक, सहाय्यक प्रशासन अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया | श्री. अजय कोठेवार, कनिष्ठ सहाय्यक, जिल्हा परिषद गोंदिया | श्री. एच.बी. चव्हाण, कार्यकारी अभियंता (ग्रापापु) जिल्हा परिषद गोंदिया |

(एच.बी. चव्हाण)
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद गोंदिया

Scanned with CamScanner